**औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.**

**<u>दिनांक 29.06.2010 रोजी (का.प.क्रं.04) संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त.</u>**

मंगळवार दिनांक 29 जुन 2010 रोजी मा.सभापती श्री.राजू रामराव शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील **मलीक अंबर स्थायी समिती सभागृह** येथे दुपारी 04.00 वाजता **वंदेमातरम्** या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त,डॉ.पुरूषोत्तम भापकर,भा.प्र.से., नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकौरी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये
02. स. श्री.विजय लक्षमणराव वाघचौरे
03. स. श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
04. स. श्री.खान आगा मीयॉ
05. स. श्री.विकास रतनलाल जैन
06. स. श्री.रेणुकादास (राजू) दत्तोपंत वैद्य
07. स. श्री.महेश शिवाजीराव माळवतकर
08. स. सौ.साधना गणेश सुरडकर
09. स. श्री.अमित सुधाकर भुईगळ
10. स. श्री.नासेरखॉन अब्दुल रहेमानखान
11. स. श्री.अब्दुल साजेद अ.सत्तार
12. स. श्री.मधुकर दामोधर सांवत
13. स. श्री.जुबेर गाझी असीर अहमद
14. स. श्री.प्रल्हाद गणपतराव निमंगावकर

**<u>विषय क्र. 09 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका शालेय विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेअंतर्गत प्रतिवर्षी 03 गणवेश (दोन रंगीत व 01 पांढरा) उपलब्ध करून देण्यांत येतात.

शासन निर्णय क्रमांक भांखस 2009/(प्र.क्र.30)/उद्योग-4, मंत्रालय, मुंबई 400 032, दिनांक 8 डिसेबंर 2009 नुसार तयार शालेय गणवेष या बाबीसाठी मे. कलावती महिला मंडळ, महात्मा फुलेनगर, ठाणे (पश्चिम) या संस्थेला आरक्षण देण्यात आले असून संस्थेचे नाव हे दिनांक 2 जानेवारी 1992 च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट - 5 मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे.

दि. 19/06/2010 रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेत मे. कलावती महिला मंडळ, यांचेकडून सन 2010-2011 या वर्षासाठी मनपा शालेय विद्यार्थ्यांना देय असलेले गणवेश खरेदी करण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतुद उपलब्ध करून देण्याच्या मान्यतेसह गणवेश खरेदीस मान्यता प्रदान केली आहे.

दि. 21/06/2010 रोजी केंद्रीय खरेदी समितीने निश्चित केलेल्या विवरणानुसार (Specification) गणवेश खरेदी करावयाचे आहेत. शिक्षण विभागाने मार्च-2010 च्या विद्यार्थी

संख्येनुसार मागणी संख्या नमूद केली आहे. शासनाने निश्चित केलेल्या दरांचा तक्ता परिशिष्ट 'अ' या सोबत जोडला आहे. त्यामध्ये वर्ग, साईज, कापडाचा दर्जा आणि गुणवत्तेच्या विवरणानुसार (Specification) दर नमूद केलेले आहेत. त्या दरानुसार गणवेश खरेदीकरीता रू.2,22,74,916/- एवढा खर्च येत आहे. शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार सदर खर्च प्रस्तावित केलेला आहे.

करीता शासनाने निश्चित केलेल्या दरानुसार येणाऱ्या रू.2,22,74,916/- च्या खर्चास व सदर साहित्य मे. कलावती महिला मंडळ, ठाणे (पश्चिम) यांचेकडून खरेदी करण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :</u>**

मा.सभापती : विषयावर चर्चा करण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत :विषय क्रमांक 9 बाबत प्रशासनाने सविस्तर खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :सविस्तर खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त(म) :महानगरपालिकेच्या वतीने महानगरपालिकेच्या शाळेमधील विद्यार्थ्यांना डॉ.बाबसाहेब आंबेडकर गणवेश सहाय्य योजनेअंतर्गत प्रतिवर्षी 03 गणवेश (दोन रंगीत व 01 पांढरा) उपलब्ध करुन देतो. या प्रमाणे विद्यार्थीसंख्या गृहित धरून शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांची संख्या प्राप्त करून त्यानुषंगाने सर्व विद्यार्थ्यांना गणवेश देणेच्या कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासन निर्णयानुसार मे.कलावती महिला मंडळ, महात्मा फुले ठाणे या संस्थेसाठी दर करारानुसार खरेदी करण्याबाबत शासन निर्णय निर्गमित यापुर्वी करण्यात आलेला आहे. गणवेश खरेदी ही हयाच संस्थेकडुन केली जावी असे शासनाने नमुद केलेले आहे. दिनांक 19.06.2010 च्या मा.सर्वसाधारण सभेमध्ये गणवेश खरेदीसाठी प्रशासकीय आर्थिक मान्यता दिलेली आहे.त्यानुषंगाने दर करारावरती हा ठराव मे.कलावती महिला मंडळ, महात्मा फुले ठाणे या संस्थेकडुन खरेदी केला जावा यासाठी हा प्रस्ताव सादर केलेला आहे. विद्यार्थ्यांच्या उंची प्रमाणे, कामकाजाचा दर्जा, गुणवत्ता हे शासन निर्णयाद्वारे निर्गमित केलेली आहे. रूपये 2,22,74,916/- एवढा खरेदीसाठी खर्च येत आहे. मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : मागच्या वर्षी जी गणवेश खरेदी केलेली आहे त्यापैकी बरेच गणवेश अद्यापपर्यंत शिल्लक आहे. शिल्लक गणवेशांचे काय केले जाणार आहे. खुलासा करण्यात यावा.

आस्थापना प्रमुख-1 : मागच्या वर्षी शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांची जी संख्या दिली होती त्याच्यानुसार गणवेश खरेदी केले होते. 75 लाख रूपयांचा जो साठा शिल्लक होता तो मागच्या वर्षी 1 ोटी 34 लाखांची खरेदी करून जे गणवेश शिल्लक राहिले होते ते वितरीत केलेले आहे. नविन वर्षामध्ये बालवाडीचे 157, पहिली वर्गाचे 17, दुसऱ्या वर्गाचे 110, तिसऱ्या वर्गाचे 129, चौथ्या वर्गाचे 133, पाचवी वर्गाचे 142, सहावी वर्गाचे 18, सातवी वर्गाचे 19 गणवेश शिल्लक आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य :गणवेश शिल्लक का राहिले, जास्तीची खरेदी केल्यामुळे शिल्लक राहिलेत का?

आस्थापना प्रमुख-1 :जास्तीचे खरेदी करण्यात आलेले नाही उलट गणवेश कमी खरेदी केले होते.

मा.सभापती :व्यवस्थितीतरित्या खरेदी केली असतांना शिल्लक कशामुळे राहिले.

आस्थापना प्रमुख-1 :Minor शिल्लक राहिलेले आहे.

मा.सभापती :75 लाखाचे शिल्लक आहे त्यास Minor म्हणता येत नाही.

आस्थापना प्रमुख-1 :मागच्या वर्षी उरलेले असल्यामुळे त्याचा यात समावेश आहे.

मा.सभापती :आवश्यकता नसतांना खरेदी का करण्यात आली.

आस्थापना प्रमुख-1 :सन 2008-09 ला जी जास्तीची खरेदी झाली होती सन 2009-10 ला कमी खरेदी करून वाटप केले.

श्री.विकास जैन :सदरची संख्या सांगत आहे ती चुकीची आहे. सदर ठिकाणी साईड व्हिजीट देण्यात यावी. हा लहान विषय नाही.

मा.सभापती :ज्यावेळेस हि खरेदी झाली ती चुकीची झाली आहे का.

आस्थापना प्रमुख-1 :शिक्षण विभागाने जी विद्यार्थी संख्या दिली होती त्यानुसार खरेदी झालेली आहे

श्री.रेणुकादास वैद्य :मागील वर्षीची त्या मागील वर्षीची व आताची विद्यार्थी संख्ये बाबत माहिती देण्यात यावी.

आस्थापना प्रमुख-1:सन 2007-08ला विद्यार्थ्यांची संख्या 27626 एकुण बुट आणि गणवेशाची खरेदी झाली होती 1 कोटी 64 लाख 96 हजार रूपयांची होती. विद्यार्थ्यांची संख्या 27565, सन 2009-10 ला 26315 सन 2010-11 ला विद्यार्थी संख्या 23637 आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :विद्यार्थी संख्या घटत असतांना गणवेश खरेदीमध्ये वाढ करीत आहे.

आस्थापना प्रमुख-1 :वाढ केलेली नाही जेवढी विद्यार्थी संख्या दिलेली आहे तेवढी खरेदी केलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : :विद्यार्थी संख्या दरवर्षी घटत आहे प्रशासन खरेदीमध्ये वाढ करीत आहे प्रशासन नको तेथे वाढीव खर्च करते. जास्तीचा खर्च करित आहे. प्रशासनाने खुलासा करावा. कार्यवाही करणार का.

मा.सभापती :समाधानकारक खुलासा करण्यात यावा.

आस्थापना प्रमुख-1 :शिक्षण विभागाने जी विद्यार्थी संख्या दिलेली आहे त्यानुषंगाने गणवेश खरेदी केलेली आहे.

श्री.मधुकर सावंत :गोर गरीब,स्लममधील विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे.

मा.सभापती :विद्यार्थ्यांना गणवेश देण्यास हरकत नाही परंतु जास्तीची खरेदी चालू आहे त्यास विरोध आहे. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असतांना जास्तीचा खर्च करणे कितपत योग्य आहे. प्रत्येक विभागाने चुकीची आकडेवारी दिली तर त्यांच्यावर कारवाई करणार का? याबाबतीतचा खुलासा होणे अपेक्षित आहे.

श्री.मधुकर सावंत :शिक्षणाअधिकारी यांनी खुलासा करावा.

मा.सभापती :यापुर्वी जी खरेदी झाली त्यावेळेस असा प्रश्न उपस्थित झाला असावा त्यावेळेस जो खुलासा देण्यात आला तो समाधानकारक होता किंवा नाही याबाबतीत खुलासा करण्यात यावा. गणवेश देण्याचा जो सर्वे केलेला आहे त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

आस्थापना प्रमुख-1 :मागच्या वर्षीची जी शिल्लक राहिलेले आहे त्याचा विचार करूनच पुढील खरेदी केलेली आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :चुक का झाली हा महत्वाचा मुद्दा आहे.

आस्थापना प्रमुख-1 :विद्यार्थी शाळा सोडुन जातात.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:राज्य शासनाचे असे निर्देश आहेत की, बेरोजगार संघटनेला डायरेक्ट कामे देण्यात यावे. तत्कालिन आयुक्तांनी असे निर्देश दिले होते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम आहे त्याप्रमाणे विनानिवीदा कुठल्याही संस्थेला काम देता येत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :विषयांतर होत आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:महाराष्ट्रात मे.कलावती महिला मंडळ हि एकच संस्था काम करण्यासाठी आहे काय?

मा.सभापती :शासनाने कळविलेले आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:शासनाच्या आदेशाप्रमाणे महानगरपालिकेचा कारभार सुरू आहे काय? याबाबतीतचा खुलासा करण्यात यावा. विना निवीदा काम कसे देता येते, याकामाचे टेंडर निघाले पाहिजे. महानगरपालिकेच्या नियमात आहे.

मा.सभापती :शासनाचे आदेश आहेत.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:शासनाचे आदेश असलेतरी डायरेक्ट असे कामे देता येत नाही असे तत्कालिन आयुक्तांनी आदेश काढले होते. टेंडर काढल्याशिवाय काम देण्यात येऊ नये. सदर संस्थेसच का कामे देण्यात येत आहे दुसऱ्या संस्था नाहित का?

श्री.विकास जैन :किती महानगरपालिकेतुन सदर संस्थेस ऑर्डर जात आहे. कामाची पुर्तता करू शकता काय? प्रशासनाने या कामाची निवीदा काढावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सदर विषय मंजूर होण्याचा प्रश्नच येत नाही, यास आमचा विरोध आहे. आम्ही तो मंजूर होऊ देणार नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :राज्य शासनाने मे.कलावती संस्थेला काम देतांना कुठले निर्देश दिले. शासनाने कुठले पत्र दिले खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:राज्य शासनाने अनेक आदेश दिलेले आहे त्या आदेशांचे पालन करत नाही. मतदान घेण्यात यावे.

श्री.मधुकर सावंत :मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

श्री.विकास जैन :महाराष्ट्र शासनाने जे आदेश दिलेले आहे ते पाळणे कितपर्यंत बंधनकारक आहे. सर्व आदेशांचे पालन होते का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार:बेरोजगार संघटना, बेरोजगार अभियंता संघटना तसेच इतर बेरोजगार संघटनांना महानगरपालिकेने काम दिलेले नाही. सदर कामाची निवीदा काढण्यात यावी.

मा.सभापती :सदरचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेमध्ये मंजूर झालेला आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:मे.कलावती संस्थेला काम द्यावे हे शासनाचे आदेश आहेत का वाचून दाखविण्यात यावे.

मा.सभापती :शासनाने दिलेले पत्राचा प्रशासनाने खुलासा करावा.

भांडार अधिक्षक :उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक 2009 (प्र.क्र.30)/उद्योग-4, मंत्रालय,मुंबई 400032, दिनांक 08 डिसेंबर 2009,

शासन निर्णय उद्योग,उर्जा व कामगार विभाग भांखस/1088/2512 उद्योग-6, दिनांक 02/01/1992 उद्योग सह संचालक यांचे पत्र वाचून दाखविण्यात आले.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:त्या वर्षापासुन तीन वर्षासाठी द्यायचे आहे. सन 1992 ते सन 1995 पर्यंत.

श्री.विकास जैन :सिंगल टेंडरला मा.आयुक्त मंजूरी देत नाही मग सिंगल एजन्सीला प्रशासन मंजूरी कशी देते.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.आयुक्तांनी खुलासा करण्यात यावा. सदरचा विषय शिक्षण विभागाशी संबधीत असून उर्जा व उद्योग खात्याने शासन निर्णय काढलेला आहे त्याबाबतीत खुलासा व्हावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सन 1992 च्या आदेशाचे सन 2010 मध्ये अंमलकरण्याचे कारण नाही.

श्री.विकास जैन :सदर गणवेश खरेदीसाठी लागणारा निधी महानगरपालिकेचा आहे की, राज्य शासनाचा.

मा.सभापती :समाधान झाल्याशिवाय विषय मंजूर होणार नाही.

श्री.विकास जैन : सदर गणवेश खरेदीसाठी लागणारा निधी महानगरपालिकेचा आहे का.

आस्थापना प्रमुख-1 : सदर गणवेश खरेदीसाठी लागणारा निधी हा महानगरपालिका फंडातुन आहे.

श्री.विकास जैन :कुठल्याही प्रकारे हा प्रस्ताव या संस्थेस देऊ शकत नाही. सर्वात्तम आपला अधिकार आहे. दोन कोटींच्या खरेदीचा विषय महानगरपालिकेचा असतांना डायरेक्ट मंजूरी या संस्थेला देत आहोत हि चुकेची बाब आहे. याबाबतची ओपन निवीदा काढण्यात यावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:राज्य शासनाने सन 1992 मध्ये शासन निर्णय काढलेला आहे त्याचा सन 2010 मध्ये उपयोग करीत आहे. खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :ज्या जी.आर.चा उल्लेख केलेला आहे. तो जी.आर.सन 1992 चा आहे. त्यामध्ये खरेदी कशी करावी या संबधीची कार्यपध्दती दिलेली आहे तथापी खरेदी करण्याबाबत बंधनकारक करण्यात आलेले आहे हा उर्जा विभागाचा निर्णय होता त्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्याच्या सर्व ऑफिसमध्ये, सरकारी कार्यालयामधून, महानगरपालिकांमधून सगळयांच्यासाठी एक Consolidated सूचना सन 1992 च्या जी.आर मध्ये करण्यात आल्या होत्या यामध्ये 8 डिसेंबर 2009 रोजी तयार गणवेशासाठी या संस्थेचा समावेश या जी.आर.मध्ये करण्यात आला त्यानुषंगाने शासनाने सूचना दिलेल्या आहेत की तयार गणवेशासाठीच या संस्थेचा समावेश केलेला असल्यामुळे त्यांचेकडून खरेदी करावे आणि म्हणून तीन वर्षासाठी हा जी.आर काढण्यात आला डिसेंबर 2009 ला तेव्हापासून तीन वर्षासाठी त्यांचेकडून खरेदी करावी.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:गेल्या 15 वर्षापासून शासनाने वेगवेगळया आदेशाद्वारे बेरोजगार संस्थांकडून काम करून घ्यावे म्हणून आदेशीत केलेले आहे. त्यावर कार्यवाही का करण्यात आलेली नाही. शासनाच्या सर्वच जी.आर.वर अंमल करण्यात यावे. एक जी.आर स्वार्थासाठी करणे योग्य नाही.

मा.सभापती : नविन निवीदा मागविल्यास यास किती कालावधी लागेल. 15 ऑगष्ट पर्यंत विद्यार्थ्यांना ड्रेस पुरविता आले पाहिजे.

श्री.रेणुकादास वैद्य :यापुर्वी 15 ऑगष्ट पर्यंत ड्रेस दिलेले नाही.

मा.सभापती :माझ्या काळात विद्यार्थ्यांना 15 ऑगष्ट रोजी ड्रेस मिळायला पाहिजे अशी अपेक्षा आहे.

श्री.विकास जैन :मे.कलावती महिला मंडळाची कॅपेसिटी किती आहे खुलासा करण्यात यावा. संबधीत मंडळाच्या प्रतिनिधींना सभागृहात बोलविण्यात यावे त्यांचेकडून खुलासा घेऊ.

मा.सभापती :आपल्या टाईम लिमीटमध्ये ड्रेस देऊ शकेल काय? किती कालावधी लागेल खुलासा करण्यात यावा.

आस्थापना प्रमुख-1 :निवीदा काढुन खरेदी केली तर त्यास कमीत कती तीन ते साडेतीन महिण्यांचा कालावधी लागेल निवीदेसाठी 15 दिवसांची मुदत त्यानंतर सॅम्पल टेस्टींगसाठी कमीत कमी 10 दिवसांचा कालावधी वर्कऑर्डर दिल्यानंतर तीन महिण्यांचा कालावधी.

श्री.मधुकर सावंत :15 ऑगष्ट पर्यंत ड्रेस मिळणार आहेत का?

मा.सभापती :सदर संस्थेस काम दिल्यास 15 ऑगष्ट पर्यंत ड्रेस उपलब्ध होतील काय?

आस्थापना प्रमुख-1 :शासनाने प्रत्येकाची Specification ठरवुन दिलेली आहे. यामध्ये दिड महिण्यांचा कालावधी वाचणार आहे.

श्री.विकास जैन : दिड महिण्यांत नाही झाल्यास मा.आयुक्त याची जबाबदारी घेतील काय? पुरवठा नाही झाल्यास प्रशासन जबाबदारी घेईल का?

श्री.अ.साजेद अ.सत्तार:आत्ता पर्यंत 15 ऑगष्टपर्यंत केव्हा ड्रेस आलेत याबाबतीतचा खुलासा करण्यात यावा.

आस्थापना प्रमुख-1 :15 ऑगष्ट पर्यंत ड्रेस पुरविण्याबाबत प्रयत्न करीत आहे.

श्री.विकास जैन :लॅबमध्ये टेस्टींगसाठी पाठविले जाणार तेथुन टेस्टींग झाल्यानंतर ड्रेस देणार हे 15 तारखेपर्यंत शक्य आहे काय? नसता संबंधीत अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करावी.

आस्थापना प्रमुख-1 :शासनाने ठरवुन दिलेले आहे, जेव्हा साठा येईल तेव्हाच तपासणी करावयाची आहे. पुर्वीचे तपासणीचे Specification ठरवुन दिलेले आहे.

श्री.विकास जैन :महापालिका शासन चालवित नाही, आपली बॉडी महानगरपालिका चालविते.

श्री.मधुकर सावंत :15 ऑगष्ट पर्यंत ड्रेस मिळणार असेल तर संस्थेला काम देण्यास हरकत नाही, जर 15 ऑगष्ट नंतर देणार असेल तर कशासाठी काम द्यायचे.

श्री.रेणुकादास वैद्य :आमचीही भावना आहे की विद्यार्थ्यांना 15 ऑगष्ट पर्यंत ड्रेस मिळावे अतिशय गरीब घरातील विद्यार्थी असतात. शाळेच्या पहिल्या दिवसापासून ड्रेस देण्यात यावा. ड्रेस देण्यास आमचा विरोध नाही. ज्या तऱ्हेने काम दिले जाते त्यास विरोध आहे.

मा.सभापती :खुलासा करण्यात यावा की, महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना 15 ऑगष्टपर्यंत ड्रेस पुरवठा करू शकतो काय?

आस्थापना प्रमुख-1 :प्रशासनाचा प्रयत्न आहे.

मा.सभापती :संस्थेकडुन तसे Affidavit करून घेण्यात यावे. संस्था जर 15 ऑगष्ट पर्यंत ड्रेस देण्यास तयार असेल तर काम देण्यास हरकत नाही.

श्री.विकास जैन :सन 1992 चा जी.आर आहे सन 1992 पासून आजपर्यंत सदर जी.आरचा किती वेळेस फॉलोअप केलेला आहे. नेहमी आपण ओपन टेंडर काढत असतो,

यापुर्वी कुठली एजन्सी होती. पुढे क्वालिटीमध्ये समस्या आल्यास त्यास कोण जबाबदार आहे. त्या व्यक्तीची आजरोजी जबाबदारी फिक्स झाली पाहिजे.

मा.सभापती :याबाबतीत एक कमिटी नेमु त्यात दोन अधिकारी आणि स्थायी समितीचे दोन सदस्य असतील. ते सदर संस्थेची कॅपेसिटी,क्वालिटी वर नियंत्रण ठेवेल.

श्री.अमित भुईगळ :दलित,मुस्लीम,स्लममधील विद्यार्थी असल्यामुळे सर्व सदस्यांना ,मा.सभापती यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदरच्या विषयास मंजूरी देण्यात यावी. 15 ऑगष्ट पर्यंत ड्रेस मिळायला पाहिजेत महानगरपालिकेच्या शाळेत सर्व गरीब घरातील विद्यार्थी शिकत असतात. सदरच्या टेंडरला तात्काळ मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती :दोन अधिकारी आणि दोन स.सदस्यांची कमिटी तयार करून सदरच्या संस्थेला हे काम देण्यात यावे. मंजूर करण्यात येतो.

श्री.विकास जैन :महानगरपालिकेचा पैसा आहे.

श्री.अमित भुईगळ :दलित,मुस्लीम,स्लममधील विद्यार्थी महानगरपालिकेच्या शाळेत शिक्षण घेतात.

श्री.विकास जैन :सभागृहाची भावना लक्षात घेऊनच मतदान घेण्यात यावे.

श्री.नासेर खान :15 ऑगष्ट पर्यंत विद्यार्थ्यांना ड्रेस मिळतील.

श्री.अमित भुईगळ :गरीब विद्यार्थ्यांच्या ड्रेससाठी जर मतदान घेत असेल तर यापेक्षा शोकांतिका दुसरी नाही.

श्री.विकास जैन :कुठलाही अधिकारी सदर संस्थेबाबत गॅरंटि घेण्यास तयार नाही. प्रशासनाने याबाबततची गॅरंटी घेण्यात यावी.
(सभागृहात सर्व स.सदस्य एकाच वेळी बोलतात)
ड्रेसची गुणवत्ता, टाईम लिमीट याबाबतीत एखाद्या अधिकाऱ्याने लेखी लिहुन देण्यात यावे.

श्री.रेणुकादास वैद्य :एखाद्या अधिकाऱ्यावर जबाबदारी फिक्स करण्यात यावी. शिक्षण विभागाने ज्या प्रमाणात संख्या दिली आहे त्याप्रमाणात ड्रेस आले पाहिजेत.

श्री.अमित भुईगळ :गोर गरीब, मागासवर्गीय विद्यार्थी शाळेत शिक्षण घेत आहे.

श्री.रेणुकादास वैद्य :ड्रेस घेण्यास विरोध नाही. याबाबतची जबाबदारी फिक्स करण्यात यावी.

श्री.विकास जैन :मतदान घेण्यात यावे.

श्री.नासेर खान :यापुर्वीच्या जे ठराव घेण्यात आले त्यात कुठल्या ठरावामध्ये मतदान घेण्यात आले खुलासा करण्यात यावा. यापुर्वी सर्वसाधारण सभेत जे कामे मंजूर झाली त्याची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्यांवर करण्यात आली त्याबाबतीतचा खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :मतदानाचा नियम आहे.

मा.सभापती :स.सदस्य श्री.वैद्य यांनी सांगीतल्याप्रमाणे एक कमिटी नेमुण अधिकाऱ्यांवर जबाबदारी फिक्स करा त्यानुसार कमिटी तयार करून अधिकाऱ्यांवर जबाबदाी फिक्स करू. त्यानंतर सदरचा ठराव मंजूर केला पाहिजे.

श्री.मधुकर सावंत :मा.सभापती यांनी जो निर्णय घेतलेला आहे की, 15 ऑगष्ट पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना ड्रेस मिळाला पाहिजे हा जो निर्णय घेतलेला आहे तो चांगला निर्णय घेतलेला आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:शासनाने तीन वर्षासाठी सांगीतलेले आहे त्याबाबतीतचा खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :मे.कलावती महिला मंडळाच्या प्रतिनीधीस सभागृहात बोलविण्यात यावे त्यांच्याकडून खुलासा घेण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:शासनाच्या आदेशाप्रमाणे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :शासनाने जे काही आदेश दिलेले आहेत, महानगरपालिकेच्या उच्च सभागृहाने सुध्दा यास मंजूरी दिलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:शासनाने जे तीन वर्ष काम करतील मे.कलावती संस्था त्यांचा अनुभव झाल्यावर त्यांच्याकडून काम करून घ्यायचे असे प्रशासनाने वाचून दाखविले आहे त्याबद्दल खुलासा हवा आहे.

मा.सभापती :स.सदस्य जे सांगत आहे ते ऐकुण घ्या.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सर्वसाधारण सभेचा खुलासा करीत आहे. जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याचा खुलासा करण्यात यावा. शासनाने जे निर्देश दिलेले आहे त्याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :राज्य शासनाचा आणि सर्वसाधारण सभेचा खुलासा या ठिकाणी करणार आहे आणि कमिटीमध्ये दोन सदस्य आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:माझा प्रश्न कमिटीबाबत नाही. शासनाने जे तीन वर्ष काम करतील मे.कलावती संस्था त्यांचा अनुभव झाल्यावर त्यांच्याकडून काम करून घ्यायचे असे निर्देश दिलेले आहे. त्याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :मे.कलावती महिला मंडळावर शासनाचे व आपले नियंत्रण राहणार आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सन 1992च्या शासन निर्णयामध्ये शासनाने उल्लेख केलेला आहे की, तीन वर्षाचा कामाचा अनुभव घेऊन नंतर त्यांना काम देण्यात यावा याबाबत महानगरपालिकेकडे काय माहिती आहे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :मा.आयुक्तांनी खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :जो निर्णय आता वाचालाय ज्या निर्णयान्वये मे.कलावती यांना काम सोपविण्यात आलेले आहे हा निर्णय डिसेंबर 2009 चा आहे सन 1992चा नाही.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सदरची संस्था सक्षम आहे का खात्री आहे का?

मा.आयुक्त :सन 1992चा निर्णय वस्तु खरेदीचा आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:सदरची संस्था सक्षम आहे हे प्रशासनाला माहिती आहे का? अनुभवाबाबत, काम वेळेवर व खात्रीशीर न झाल्यास तुम्हाला विचारणा करण्यात येईल.

मा.आयुक्त :अनुभववाचा काही संबध नाही, अनुभव पुढे पहायचा आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:संस्थेच्या कॅपेसिटीबाबत खुलासा पाहिजे.

श्री.विकास जैन :प्रशासनास या एजन्सीमध्ये एवढा Intrest का आहे, ओपन टेंडर काढले पाहिजे.

मा.आयुक्त :Intrest आजिबात नाही, 15 ऑगष्टपर्यंत विद्यार्थ्यांना ड्रेस मिळाले पाहिजे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:राज्य शासनाने आदेश काढले होते, तत्कालिन आयुक्तांनी आदेश काढले की, शासनाचे जरी आदेश असले तरी महानगरपालिकेच्या नियमानुसार देता येत नाही. शासनाचे कुठल्या आदेशाचे पालन केले. बेरोजगार संस्थाना कामे देण्यात यावी.

मा.आयुक्त :या संस्थेस काम द्यावे किंवा नाही हे सभागृहाने ठरवावे आमचे हे म्हणने होते की, 15 ऑगष्ट रोजी दिले जावे काही वर्षाचा अनुभव पहाता डिसेंबर,जानेवारी उजाडत होता म्हणून हा प्रस्ताव ठेवलेला आहे तो द्यायचा किंवा नाही हे सभागृहाने ठरवावे.

श्री.मधुकर सावंत :मा.आयुक्तांनी केलेल्या खुलाशाप्रमाणे 15 ऑगष्टपर्यंत ड्रेस देण्यात यावे हा ठराव मंजूर करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:मंजूर करण्याचा प्रश्नच येत नाही. मतदान घेण्यात यावे.

श्री.मधुकर सावंत :आत्तापर्यंत सभागृहात किती ठरांवाना मतदान घेण्यात आले खुलासा करण्यात यावा.

श्री.विकास जैन :मतदानाचा अधिकार आहे. खुलासा करण्यात यावा.

श्री.मधुकर सावंत :मा.आयुक्तांनी खुलासा केलेला आहे गरीब मुलांना 15 ऑगष्ट पर्यंत ड्रेस मिळाले पाहिजे सदर प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. उपआयुक्त आणि शिक्षणाधिकारी आणि दोन सदस्य यांची कमिटी तयार करून मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती :लेखाधिकारी यांनी खुलासा करण्यात यावा.

श्री.अ.साजेद अ.सत्तार:शासनाने चार संस्थेला काम देण्यात यावे त्याची अंमलबजावणी का झाली नाही. उपस्थित प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

(स.सदस्य श्री.अ.साजेद अ.सत्तार मा.सभापती यांचे समोर खाली जमीनीवर बसतात.)

मा.सभापती :स.सदस्यांनी वरती बसावे

श्री.अ.साजेद अ.सत्तार:माझ्या प्रश्नाचे उत्तर का देण्यात येत नाही.

मा.सभापती :10 मिनीटांसाठी सभा तहकूब करण्यात येते.
(सभा दूपारी 4.50मिनीटांनी तहकूब)
(सभा सुरू सायं 5.30 मिनीटांनी सुरु )

मा.सभापती :सर्व सभागृहाच्या स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता प्रशासनास आदेश देण्यात येते की, उद्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत एखादया अधिकाऱ्यावर जबाबदारी फिक्स करावी. गरीब विद्यार्थ्यांचा गणवेशाचा प्रश्न आहे. गंभीर प्रश्न आहे. गणवेशाची गुणवत्ता चांगली असली पाहिजे. आस्थापना अधिकारी-1,शिक्षणाधिकारी यांच्यावर जबाबदारी फिक्स करण्यात यावी सकाळी 10.00 वाजेपर्यंत नांवे देण्यात यावी. सकाळी 11.30 वाजता सभा सुरू होईल तोपर्यंत सभा तहकुब करण्यात येते.

**नगर सचिव,**
महानगरपालिका औरंगाबाद